<u>**आदेश निशाण क्र .१४ खाली**</u>

१. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदारातर्फे विधीज्ञ डी.एस. बनसुडे यांनी असा युक्तीवाद केला की, गैरअर्जदार क्र.१ हा एस.टी. महामंडळात डिव्हीजन स्टोअर ऑफीसर या पदावर दापोडी, पुणे येथे कार्यरत आहे. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यास रक्कम रु.३,१७,०००/– येणे प्रमाणे पोटगीची रक्कम आजपर्यंत जाणीवपूर्वक दिलेली नाही. गैरअर्जदार हा जाणीवपूर्वक अर्जदाराच्या पोटगीची रक्कम न्यायालयात जमा करत नाही. अर्जदार हिचे वर दोन वर्षाचा लहान मुलाचा सांभाळ करण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ च्या मासिक वेतनातून सदरची रक्कम कपात होऊन न्यायालयात जमा होण्याचा आदेश करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

२. गैरअर्जदार यांचे असे कथन आहे की, गैरअर्जदारचे पगारपत्रक हे ट्रेजरी ऑफीसर पुणे डिव्हीजन, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या अख्त्यारात असल्याने या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाही म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व त्यावरील महणण्याचे अवलोकन केले. सदर प्रकरणी युक्तीवाद ऐकल्यानंतर नि. क्र. १ वर आदेश पारीत करुन गैरअर्जदार क्र. १ यांना मा. सर्वोच्च न्यायालय यांनी घालून दिलेल्या ***रजनिश वि. नेहा*** क्रिमिनल अपील क्र**.** ७३०/२०२० सर्वोच्च न्यायालय या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वानुसार त्यांचे वार्षिक उत्पन्न किती आहे ? याबाबत शपथपत्र दाखल करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. आता अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, गैरअर्जदार क्र. १ याने नि. क्र. २१ कडे त्यास एकुण मासिक वेतन रु.३५,९११/– इतके असून त्यातून वजा जाता रु. ३१,५६०/– इतके नक्त वेतन असलेबाबत शपथपत्र दाखल केले आहे. गैरअर्जदार याने नि. क्र. २३ कडे कागदपत्र यादीपोटी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी, पुणे यांचेकडील वेतन पत्रिका दाखल केलेली आहे. सदर वेतन पत्रिकेचे अवलोकन केले असता, गैरअर्जदार क्र. १ यास नक्त वेतन रु.३१,५६०/– असल्याचे दिसून येते.

४. अर्जदार हिचे असे कथन आहे की, म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. २/२०१५ मधील न्यायनिवाडयानुसार अर्जदार हिस गैरअर्जदार क्र. १ याच्याकडून रक्कम रु.३,१५,०००/– व खर्चापोटी रक्कम रु.२,०००/– असे एकूण रु.३,१७,०००/– इतके येणे आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये ही बाब नाकारली नाही. अर्जदार हीने अभिलेखावर नि.क्र. २६ कडे फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २/२०१५ मधील न्यायनिकाली सत्यप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदरचे प्रकरण हे दि.०२/०५/२०१८ रोजी निकाली निघालेले आहे. याउपर प्रस्तुतचा अर्ज हा दि.०४/०६/२०१८ रोजी दाखल केलेला आहे. त्यावरुन अर्जदाराने दाखल केलेला अर्ज हा मुदतीत असल्याचे दिसून येते.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHOS070008822018/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com

५. अर्जदाराचे विधीज्ञ यांनी त्यांचे युक्तीवादाचे पुष्टर्थ ***शांता ऊर्फ उषादेवी आणि इतर वि. बी.जी. शिवाननजप्पा व राजेश भिवाजी नंदे वि. महाराष्ट्र राज्य सरकार आणि इतर*** या न्यायनिवाडयांचा आधार घेतला आहे. अर्जदाराचे विधीज्ञ डी.एस. बनसुडे यांनी युक्तीवादामध्ये गैरअर्जदार यांनी दाखल केलेले नि.क्र. २१ वरील पुराव्याचे शपथपत्रानुसार गैरअर्जदार याचे मासिक वेतनामधून अर्जदार हीस देय असलेली पोटगी रक्कम देण्याचे युक्तीवादामध्ये नमुद केले.

६. अभिलेखावरील कागदपत्रे, वर नमुद न्यायनिवाडे या सर्व बाबींचा सारासार विचार केला असता, गैरअर्जदार हा जाणीवपूर्वक पोटगी रक्कम भरण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे दिसून येते. अर्जदार क्र. १ हिच्यावर अर्जदार क्र. २ आदित्य याची पालनपोषण व संगोपनाची जबाबदारी असल्याचे देखील स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र. १ यास मासिक वेतन रु.३१,५६०/– इतके असल्याचे त्यास मान्य आहे. त्यामुळे अर्जदार यांचे पालन पोषण होणेकामी गैरअर्जदार क्र. १ याच्या मासिक वेतनातून रक्कम वजा होऊन अर्जदार हीस मिळणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६० अन्वये पगारातून पहले रु.१,०००/– व शिल्लक रक्कमेपैकी २/३ रक्कम वगळता राहिलेल्या रक्कमेतून रक्कम रु.१०,०००/– (दहा हजार रुपये) होणे योग्य व संयुक्तीक आहे. अर्जदार याने युक्तीवादाच्या पुष्टर्थ दाखल केलेला ***शांता ऊर्फ उषादेवी आणि इतर वि. बी.जी. शिवाननजप्पा व राजेश भिवाजी नंदे वि. महाराष्ट्र राज्य सरकार आणि इतर*** मधील न्यायनिवाडा प्रस्तुत अर्जदाराच्या कथनास पुष्टी देणारा आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आ दे श –**

१. नि.क्र. १४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. कार्यालय प्रमुख, एस.टी. महामंडळ डिव्हीजन ऑफीस दापोडी, पुणे विभागीय कार्यालय राज्य परिवहन पुणे, लेखाधिकारी विभाग पुणे यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी गैरअर्जदार क्र. १ अमितसिंग अरुणसिंग परदेशी याच्या पगारातून दरमहा रक्कम रु.१०,०००/– (अक्षरी दहा हजार रुपये) कपात करुन या न्यायालयात रक्कम रु.३,१७,०००/– (अक्षरी तीन लाख सतरा हजार रुपये) फेड होई पर्यंत जमा करावी.

सही/–

दिनांकः–१६/०८/२०२१.

( ए.डी.पाटील )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
उमरगा.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHOS070008822018/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com

www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com



**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Clerk | ---- | S.J. Shinde |
| Court | ---- | J.M.F.C. Omerga Court no.3 |
| Date | ---- | 16/08/2021 |
| Order signed by the Presiding Officer on | ---- | 16/08/2021 |
| Order uploaded on | ---- | 16/08/2021 |

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHOS070008822018/truecopy/order-1.pdf